# निधन वार्ता

## सौ.वैजयंताबाई शिवदास भोलाणे : आज अंत्ययात्रा



**धरणगाव । प्रतिनिधी ।** येथील शिवदास गरबड चौधरी यांच्या पत्नी सौ.वैजयंताबाई शिवदास भोलाणे (वय ८६) यांचे रविवार, दि.२२ रोजी सकाळी वृध्दापकाळाने १०.३५ वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, चार मुले, एक मुलगी, सूना, नातवंड असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा आज सोमवार, दि.२३ जून रोजी सकाळी ९ वाजता त्यांच्या नेताजी चौक येथील रहात्या घरापासून निघेल. त्या येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, भाजपाचे माजी तालुका उपाध्यक्ष, खर्दे माध्यमिक विद्यालय तथा विवेकानंद पतसंस्थेचे चेअरमन, ॲड.वसंतराव शिवदास भोलाणे, सेवानिवृत्त समाज कल्याण अधिकारी शालिग्राम भोलाणे, एस.टी.वाहतूक नियंत्रक रमेश भोलाणे, किशोर भोलाणे यांच्या मातोश्री आणि डॉ. शुभम भोलाणे, स्वप्निल भोलाणे, निखिल भोलाणे, हर्षल भोलाणे वैभव भोलाणे यांच्या आजी होत.

## बाळू देवचंद चिमणकर



**जळगाव । प्रतिनिधी ।** रावेर तालुक्यातील चिनावल येथील रहिवासी बाळू देवचंद चिमणकर यांचे दि.२१ जून रोजी अकस्मात निधन झाले. त्यांच्या पश्चात भाऊ, वहिनी, मुलगा, सून, नात, चार मुली, जावई आहेत. ते जळगाव येथील पुरवठा विभागात कार्यरत श्री.चिमणकर यांचे काका होत.

## पुष्पाबेन सुभाष पाटील



**नंदुरबार । प्रतिनिधी ।** शहादा तालुक्यातील लांबोळा येथील रहिवासी पुष्पाबेन सुभाष पाटील (वय ७१) यांचे दि. १८ जून रोजी निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, जावाई, सूना, नातवंडे असा परिवार आहे. त्या मेघश्याम पाटील व नंदकिशोर पाटील यांच्या आई होत तर डॉ.जयप्रकाश पटेल, जगदीश पटेल व डॉ.विजय पटेल यांच्या भगिनी होत्या तसेच शरद पटेल यांच्या सासू होत्या.



# चोपड्याच्या पंकज महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

■ **चोपडा । प्रतिनिधी**

येथील पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्था संचलित पंकज महाविद्यालयात प्राचार्य डॉ.आर आर.अत्तरदे यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेश बोरोले,उपाध्यक्ष अविनाश राणे, संचालक पंकज बोरोले,प्राचार्य प्रो.डॉ.आर.आर. अत्तरदे माध्यमिकचे मुख्याध्यापक व्ही.आर.पाटील,प्राथमिकचे मुख्याध्यापक एम. व्ही.पाटील, रासेयोचे विभागीय समन्वयक डॉ. दिलीप गिर्हे मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेश बोरोले म्हणाले की, निरोगी जीवनासाठी योगशास्त्राच्या उपयुक्ततेवर भर देत सर्वांना आरोग्यदायी जीवनशैली अंगिकारण्याचा संदेश दिला. योग दिनानिमित्त महाविद्यालयातील प्राध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी व विद्यार्थीकरिता योगाचे धडे घेण्यात आले.यावेळी योग प्रशिक्षक योगेश चौधरी, गायत्री शिंदे यांनी योगाचे विविध प्रकार प्रत्यक्षरूपात करून दाखविले. प्राणायाम,अनुलोम-विलोम,उभे व बैठे आसन,पोटावरचे आणि पाठीवरचे आसने यांचे सविस्तर प्रात्यक्षिक सादर करून योगासनांचे होणारे शारीरिक व मानसिक फायदे तसेच योग्य पद्धतीने योगसाधना केल्यास आरोग्यावर होणारे सकारात्मक परिणाम त्यांनी स्पष्ट केले.योग शिबिराला राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. अरुण मोरे,सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.सुनिल सुरवाडे महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. नंदिनी वाघ तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा समावेश होता.योग दिनाच्या कार्यक्रमामुळे सहभागी शिक्षकांसह कर्मचाऱ्यांना योगसाधनेचे महत्त्व पटले.

### महिलांच्या सशक्तीकरणाची नवी चळवळ-पाळधीत 'बहिणाई मार्ट'भूमिपूजनाने नवा अध्याय

# बचत गट समाजपरिवर्तनाचे शक्तीकेंद्र-ना.गुलाबराव पाटील

■ **पाळधी, ता.धरणगाव । प्रतिनिधी**



जिथे स्त्री सक्षम आहे, तिथे कुटुंब समृद्ध असते आणि जिथे कुटुंब समृद्ध आहे तिथे समाज उन्नत होतो. महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा मार्ग स्वीकारला, हेच खरे सशक्तीकरण आहे, आणि त्या सशक्ततेचे प्रतीक म्हणजे 'बहिणाई मार्ट', असे प्रतिपादन राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री,जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.

पाळधी-बांभोरी परिसरातील स्त्री शक्ती महिला प्रभाग संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते 'बहिणाई मार्ट' या उपक्रमाचे भूमिपूजन पार पडले. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या वेळी बोलताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, सरकार तुमच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. गावागावातल्या घराघरातून उद्योजिका तयार होतील, ही आमची पूर्ण खात्री असून पाळधीच्या मातीतून आता बचत गटांचा स्वतःचा ब्रँड निर्माण व्हावा, उत्पादनातून ओळख तयार व्हावी, महिलांना थेट बाजारपेठ मिळावी हीच आमची अपेक्षा आहे. महिला बचतगटांचे वेळेत कर्जफेडीमुळे बचतगटांचा बँकांमधील विश्वास वाढलेला असून त्यांची बँकांमध्ये पत वाढलेली आहे. आज बचतगट हे केवळ महिलांचे बचतीचे माध्यम राहिले नसून, समाज बदलवण्याचे शक्तीकेंद्र बनले आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी, स्त्री शक्ती हेच खऱ्याअर्थाने बचतगटांचे सामर्थ्य आहे. महिलांना बचतीचे महत्त्व असून जिद्दीने व्यवसाय वाढवावा, प्रशासनाच्या दृष्टीने बचतगट हे अत्यंत विश्वासू घटक आहेत, असे मत व्यक्त केले.

प्रकल्प संचालक राजू लोखंडे यांनी सांगितले की, जिल्ह्यातील ३० हजार बचतगटांना आतापर्यंत ७५० कोटी रुपयांचे कर्ज वितरित झाले असून, आगामी काळात दरवर्षी ८०० ते १,००० कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्याचे उद्दिष्ट आहे. माजी जि.प.सदस्य प्रतापराव पाटील यांनी ग्रामसंघाच्या कार्यालयासाठी सहकार्य देण्याची ग्वाही दिली. आदिवासी विभागाचे प्रकल्प संचालक अरुण पवार यांनी आदिवासी महिलांसाठीच्या योजनांची माहिती देत त्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्त्री शक्ती महिला प्रभाग संघाच्या अध्यक्षा उषाबाई पाटील होत्या. प्रारंभी दीपप्रज्ज्वलन व स्वागतगीताने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. प्रास्ताविक तालुका अभियान व्यवस्थापक किरण महाजन यांनी केले. सूत्रसंचालन कृषी सखी आशा पाटील आणि सुवर्णा साळुंखे यांनी, तर आभार प्रदर्शन पुनम पाटील यांनी केले.

**यांची होती उपस्थिती**

कार्यक्रमाला जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषद माजी सदस्य प्रताप राव पाटील, सरपंच लक्ष्मीताई कोळी, उपसरपंच दिलीप पाटील , मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मीनल करणवाल, प्रकल्प संचालक राजू लोखंडे, आदिवासीप्रकल्प अधिकारी अरुण पवार, गटविकास अधिकारी किशोर वानखेडे, जिल्हा अभियान व्यवस्थापक हरेश्र्वर भोई, अनिल कासट, मच्छिंद्र साळुंके, चंदू माळी, दिगंबर सोनवणे, ग्रामविकास अधिकारी डी.डी. पाठक, संजय महाजन, समाधान पाटील, तालुका प्रमूख डी. ओ. पाटील, सचिन पवार, रवी चव्हाण सर, विविध बँकांचे मॅनेजर, यांच्यासह पाळधी - बांभोरी प्र. चा. जिल्हा परिषद गटातील बचत गटांच्या महिलांची उपस्थीती ही लक्षणीय होती.

# अमळनेर येथे ११ विद्यार्थ्यांनी घेतली बाल सानेगुरुजी कलाकाराची मुलाखत



■ **अमळनेर । प्रतिनिधी**

अमळनेर येथे ७५ व्या स्मृती दिनानिमित्त ११ विद्यार्थ्यांनी बाल साने गुरुजी कलाकाराची मुलाखत घेतली.

साने गुरुजी कर्मभूमी स्मारक प्रतिष्ठान येथे सुजय डहाके दिग्दर्शित श्यामची आई या सिनेमात श्याम (साने गुरुजी)ची (शर्व गाडगीळ, पुणे) भूमिका करणाऱ्या कलाकाराची समूह मुलाखत अमळनेर येथील अद्विक भुषण सोनवणे, शिव रणजित शिंदे, मानवी सुनील पाटील, मुक्ता गौरव महाले, मानसी रमाकांत सैंदाणे, दक्षता उमेश काटे, कल्याणी संदीप पाटील, गार्गी सुनील जोशी, वेदांत रविंद्र देवरे, मानसी अनुराधा किशोर आदींनी बालकलाकाराची यांनी मुलाखत घेतली. या मुलाखतीत तूला जेवायला काय आवडते. कोणते खेळ आवडतात, तू पुस्तक वाचतो का? तूला आई रागवते का? तू शिक्षक होशील का? पासून साने गुरुजी विषयक माहिती असे भरपूर अनेक प्रश्न विचारले. पालकांनी देखील प्रश्न विचारले. त्यावेळी साने गुरुजी जीवनगाथा या परीक्षेत परीक्षण लिहलेले नारायण पवार देखील उपस्थित होते.

डॉ विकास हरताळकर यांच्या स्वामी विवेकानंद शाळेतील मुलेमुली देखील चोपडा येथून या कार्यक्रम पाहण्यासाठी आले होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी गौरव महाले, संजय बारी , शुभम पवार, प्रथमेश कोठावदे, प्रणव पाटील, आश्विनी वाघमोडे, शिव निकम, अभय वाघमोडे, खुशाल भामरे, देवेंद्र पाटील, मंदाकिनी पाटील यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दर्शना पवार यांनी केले. मुलांचे व पाहुण्यांचे स्वागत मिलींद वैद्य, चेतन सोनार , गोपाळ नेवे यांनी केले. या विशेष कार्यक्रमाच्या वेळी श्याम म्हणजे शर्व गाडगीळच्या आई ऋचा मुळेदेखील उपस्थित होत्या. अमळनेर परीसरातील सर्व पालक शाळा शिक्षक आदींचे स्वागत व आभार मानले.

अखिल भारतीय रिलीज उद्घाटन
अशोक DOLBY DIGITAL (एअरकंडिशन में)
ता. २० से जनता की जोरदार फरमाईश पर फिर से रोजाना १२,३,६ व ९ बजेसे एक्शन, मारधाड, थ्रिलर, प्रतिकवाद, LUCITER की सिक्वेल प्रभावी चित्रपट




L2 - एमपुरन
(साऊथ इंडियन हिंदीमे)
कलाकार : मोहनलाल, पृथ्वीराज, सानिया, अभिमानसिंग
(टिप - BMS पर online बुकींग शुरु है)

## नशिबाची परीक्षा

सोमवार २३/०६/२०२५

**✻ मिलन डे ✻**

१९० १४६
२८ **०-१** ४७०
४६० ३४४
सिंगल ०-३-७
जोड ०८-२१-३९-४७-१५

**✻ कल्याण बाजार ✻**

१२५ १२६
२६० **८-९** २७०
४६८ २२५
सिंगल ८-१-५
जोड ८२-६९-०१-५७-९४

**✻ मुंबई (मेन) बाजार ✻**

१३७ १७०
३८० **१-८** १८९
३३५ ११६
सिंगल १-४-६
जोड १२-९८-४५-६०-८७

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये मो.९९७५४७९८२६

**शनिवार २१/०६/२०२५**
मेन बाजार -
मिलन ना. - ४४७-५६-३६७

**रविवार २२/०६/२०२५**
मेन बाजार -
कल्याण -
मिलन डे -
मिलन ना. -

## कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| २८-०४ २०२५ ०३-०५- २०२५ | ७८९ ४३ २५६ | १२८ १४ १६७ | ३४५ २५ १६८ | १५० ६९ १८० | १३६ ०५ १५९ | १२७ ०० ५६९ |
| २८-०४ २०२५ ०३-०५- २०२५ | १३५ ९८ ११६ | ४७९ ०४ ११२ | १३६ ०३ १४८ | १२३ ६२ १३८ | १५८ ४७ २६९ | २५७ ४५ २५८ |
| १२-०५ २०२५ १७-०५- २०२५ | २३३ ८२ ३३६ | ५६९ ०० ३८९ | २७८ ७४ ५९० | २८८ ८३ १५७ | ३८९ ०८ ४६८ | ६९० ५७ १६० |
| १९-०५ २०२५ २४-०५- २०२५ | ६९० ५७ १६० | १९० ०० १४५ | १६७ ४७ ३४० | २३७ २१ १३७ | १७९ ७२ १२९ | ३९० २६ ३६७ |
| २६-०५ २०२५ ३१-०५- २०२५ | १४८ ३० १४५ | २५९ ६१ १२८ | ४७० १६ ४५७ | १२५ ८१ ६७८ | ७९० ६५ ६९० | ● |
| ०१-०६ २०२५ ०७-०६- २०२५ | २२९ ३४ ४५५ | ८९९ ६२ १३८ | ७७८ २१ ४७० | २४४ ०२ ३३६ | २५५ २३ २४७ | ११० २४ २४८ |
| ०९-०६ २०२५ १४-०६- २०२५ | ५७९ ११ ३३५ | ९९० ८९ ५६८ | ३५६ ४० ५७८ | १६० ७६ ७९० | १५८ ४४ १६७ | १३३ ७५ १५९ |
| १६-०६ २०२५ २१-०६- २०२५ | ५७८ ०७ ११५ | २२० ४२ १३८ | ४४६ ४८ १२५ | १४८ ३३ ५९९ | २७८ ७२ ३९० | ६८९ ३४ ७७० |

## मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| २८-०४ २०२५ ०३-०५- २०२५ | २३८ ३३ ३४६ | १७० ८६ २४० | ४४४ २५ १६८ | ३८९ ०३ २३८ | १७९ ७४ ६९९ | ● |
| २८-०४ २०२५ ०३-०५- २०२५ | १३५ ९९ ३७९ | ४४९ ७८ ३५० | ३३६ २६ ८८० | २४८ ४८ २७९ | १६६ ३० ४७९ | ५९० ४८ १८९ |
| १२-०५ २०२५ १७-०५- २०२५ | १३५ ९६ २६८ | २८८ ८९ ३६० | ८९० ७३ ५८० | १२० ३१ ६६९ | ६६८ ०८ १३४ | २५६ ३४ २३९ |
| १९-०५ २०२५ २४-०५- २०२५ | २५६ ३४ २३९ | ३८० १२ ३४५ | २७८ ७० १३६ | २६९ ७० ३८९ | १२३ ६० १४५ | १६९ ६७ २५० |
| २६-०५ २०२५ ३१-०५- २०२५ | ४७९ १७ ३६८ | ५०० ५४ २४८ | ५७० २८ ३६९ | ३४७ ४० १४५ | ६७७ ०३ ३४६ | ५७० २८ ४५९ |
| ०१-०६ २०२५ ०७-०६- २०२५ | ५७९ १५ २५८ | ४६८ ८२ ३४५ | २४८ ४३ १६६ | ६९० ५९ २८९ | ४६८ ८६ ३४९ | ११४ ६३ २५६ |
| ०९-०६ २०२५ १४-०६- २०२५ | २४५ १४ ७७० | ४५० ९७ ५५७ | ५६० १२ ११० | १९० ०४ १४९ | २३९ ४४ २३९ | २४० ६४ २६६ |
| १६-०६ २०२५ २१-०६- २०२५ | ४८९ १२ ५७० | २४६ २१ ३४४ | १३७ १५ २५८ | ८०० ८७ १६० | ४५७ ६७ ४५८ | ५९९ ३५ ११३ |

## मिलन नाईट

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| २३९ ४५ १७७ | २८० ०५ ७८० | १५८ ४७ १३३ | १५९ ५१ ६७८ | ६६८ ०५ १४० | २३४ ९६ २४० |
| २५९ ६४ २६६ | ३४८ ५७ ३४० | ३५७ ५९ ३७९ | २५८ ५६ १७८ | २७९ ८६ ८८० | १६७ ४४ १४९ |
| १६७ ४४ १४९ | ४६७ ७९ २७० | २३५ ०६ ६०० | १७९ ७४ २३९ | १७० ८२ ३९० | ५८० ३२ २३७ |
| ५८९ २९ १९९ | ७८० ५६ १२३ | २६७ ५० १४५ | १२६ ९५ १५९ | ११६ ८१ १५५ | ७०० ७७ ४६७ |
| १२८ १८ ४७७ | १४६ १७ ८९० | ४६० ०३ ५९९ | १६७ ४१ ३९९ | ५५८ ८७ २५० | ३९९ १३ २५६ |
| २२४ ८१ ४७० | ६७७ ०६ ३५८ | १२३ ६९ ९०० | ३६९ ८६ २६८ | १५० ६४ २२० | ३६८ ७१ ४७० |
| १६९ ६० ४७९ | ४९० ३७ ३७० | २३५ ०५ ७८० | २३५ ०३ ६८९ | १७७ ५५ २५८ | ३८९ ०२ ५८९ |
| ४९९ २२ ६८८ | २९० १३ ३५५ | ५७० २९ ३६० | २८० ०१ ५६० | १७७ ५९ ३७९ | ४४७ ५६ ३६७ |

## पान १ वरुन ...

### ग्रामराज्याचा आदर्श

त्याचा परीघ महिला घर ते समाज असा सहज विस्तारु शकतात. गावाच्या समस्यांकडे संवेदनशीलतेने पाहू शकतात. म्हणूनच गावात हुंडाबंदी शक्य झाली असावी. अवयदानाचा अवघड निर्णय गाव घेऊ शकले. अवयवदानाविषयी समाजात गैरसमज आढळतात. शवाची चिरफाड केली जाते आणि विद्रुपता येते हा त्यापैकीच एक. शिवाय याच्याशी परंपराही जोडल्या गेल्या आहेत. ते गैरसमज दूर करणे सोपे नसतेच. महिलांनी गावाच्या मदतीने ते आव्हान यशस्वीपणे पेलले आणि त्याची सुरुवातही केली. तात्पर्य, **ईश्वरसेवाची गांव-सेवा । तो सर्वांच्याचि सुखाचा ठेवा ।**, असे संत तुकडोजी महाराज म्हणतात तेच खरे.

### पूर्वी भाजपा तत्वावर चालत होती

यांच्यासोबतच मी असणार असल्याचा पुनरुच्चार खडसे यांनी केला.

भाजपच्या या अवस्थेला राज्याचे नेतृत्व जबाबदार आहेत का असे विचारले असता खडसेंनी मात्र देवेंद्र फडणवीस यांना क्लीन चीट देत यासाठी त्यांना एकट्याला दोष देणे चुकीचे असल्याचे म्हटले. प्रक्रियेत असणारे सर्व आणि पक्षात प्रवेश देणारे संघटनेचे नेते यास जबाबदार असल्याचे खडसेंनी म्हटले. मी भाजपमध्ये असताना गिरीश महाजन माझा सामान्य कार्यकर्ता होता, मी मंत्री असताना त्याला मंत्रिमंडळात स्थान नव्हते. मी गेल्यावर तो कार्यकर्त्यांचा मंत्री झाला, असे म्हणत गिरीश महाजन यांच्यावरही खडसेंनी टीका केली. दरम्यान, भाजपच्या विरोधात दोन ठाकरेंनी एकत्र आलेच पाहिजे याशिवाय सत्ताधाऱ्यांना विरोध करणाऱ्या सर्वांनी एकत्र आल्यास आगामी निवडणुकात चांगले यश मिळेल असा विश्वास खडसे यांनी व्यक्त केला.

### खडसे भाजपामध्ये येण्यासाठी कासावीस

महामार्गाचा विस्तार केला जाईल. द्वारका जंक्शन आणि इतर महत्त्वाच्या रस्त्यांबाबत चर्चा झाली आहे. नाशिक रिंग रोडचे काम लवकर पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. द्वारका जंक्शनवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. बोगद्याचा उपयोग होत नसल्याने, नवीन डिझाईन एमएसआरडीसीला करण्याचा सूचना दिलेला आहे. तीन महिन्यात कामाला सुरुवात होईल, अशी माहिती गिरीश महाजन यांनी दिली आहे.

### कर्तृत्वाचा मक्ता फक्त पुरुषांकडेच नाही!

बदल स्वीकार करायची नसते. त्यामुळे अशा गोष्टींना विरोध होतो. सुदैवाने महाराष्ट्रामध्ये हा कायदा आपण केला. महिलांना अधिकार दिले ते निव्वळ या कायद्याने प्रॉपर्टीत नाही तर सत्तेमध्ये सुद्धा निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये महिलांना अधिकार देशात पहिल्यांदा महाराष्ट्रात दिला. खासदार सुप्रिया सुळे, दिग्दर्शक प्राजक्त देशमुख, धैयकन्या आसावरी जगदाळे, मनीषा सजनपवार, डॉ. श्यामल गरूड, कमल कुंभार, उल्का महाजन, डॉ. शबनम शेख, अलका धुपकर यांची भाषणे झाली.

### बापाने केला पोटच्या मुलाचा खून

शुभम घरात झोपलेला असतांना त्यांचे वडील धनराज सुपडु सुरडकर(वय-४५) रा कसबा- पिंप्री यांनी रागाच्या भरात मोठा दगड शुभमच्या डोक्यात टाकला.त्यानंतर त्यांचा मृतदेह गांवापासून एक किमी अंतरावर शेख करीम यांच्या शेताजवळील रस्त्यांच्या कडेला नेऊन टाकला.पोलीस तपासात आरोपी निष्पन्न झाल्याने धनराज सुरडकर यास अटक करून त्यांच्या विरुध्द फत्तेपूर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आलेलाआहे.या घटनेतील आरोपी संख्या वाढण्याची शक्यता आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस उपविभागीय अधिकारी धनंजय येरूळे यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पो.नि.अंकुश जाधव व सहकारी करीत आहेत.या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडालेली आहे.

### अमेरिकेचा इरानवर बॉम्ब हल्ला

झोन घोषित केल्यानंतर विमा कंपन्यांनी आपले प्रिमियम वाढवले आहेत. अनेक शिपिंग कंपन्यांनी होरमूज या भागातून जाण्याऐवजी अन्य वैकल्पिक रस्त्याने जाण्याचा पर्याय निवडला आहे. यामुळेच आता कच्च्या तेलाच्या निर्यातीसाठी लागणारा वेळ आणि खर्च हे दोन्ही वाढले आहेत.

**१२० डॉलर्स पर्यंत जाऊ शकतो भाव**

उर्जा क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते होरमूज जलडमरुमध्य या भागातील कच्च्या तेलाचा निर्यातीत काही बाधा निर्माण झाली तर यामुळे कच्च्या तेलाची किंमत वाढ शकते. क्रूड ऑईलचा भाव थेट १२० डॉलर्स प्रति बॅरलपर्यंत पोहोचू शकतो. जेपी मॉर्गन, सिटी बँक आणि डॉयचे बँक यासारख्या अनेक वित्तीय संस्थांनी तर इराण-इस्रायल संघर्ष असाच कायम राहिला तर कच्च्या तेलाची किंमत तब्बल १३० डॉलर्स प्रति बॅरलपर्यंत पोहोचू शकते, असे भाकित व्यक्त केले आहे.

देशदूत 'CLASSIFIED' छोटी जाहिरात तुमची, समाधान आमचे प्राधान्य!

सूचना वृत्तपत्रातुन प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी जाहीरात संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'देशदूत'वृतपत्र समुह कोणतीही हमी घेत नाही,जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता न झाल्यास त्याच्या परीणामाबद्दल 'देशदूत' वृतपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक,संपादक वमालक तसेच जाहीरात एजनसीचे मालक जवाबदार राहणार नाही याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी

**पाहिजेत**
हेअर कटींग सलुन दुकान कामासाठी ट्रेन/अनट्रेन कारागीर पगारी व कमिशन बेसीसवर पाहीजेत. न्हावी समाजाच्या गरिब व होतकरु मुलांना न्हावी या व्यवसायाचे प्रशिक्षण बेसीक पासुन ते प्रोफेशनल सलुन डिप्लोमापर्यन्त मोफत दिले जाईल. तसेच जळगाव व्यतिरिक्त बाहेर गावाच्या मुलांना राहण्याची व जेवनाची व्यवस्था मोफत आहे. फॅमिलीसह राहणाऱ्यांसाठी रुम उपलब्ध आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम- ३९६२६० दि.३०/६/२५)

**फेंगशुई**
सुख समृध्दीसाठी बिना तोड-फोड वास्तुदोष निवारण पारंपरीक वास्तु शास्त्र प्राचीन फेंगशुई द्वारे सर्व समाधन,फेंगशुई तज्ञ सुर्यवंशी **9881462286,** (VM 23/05/26)

**वॉटर प्रुफिंग**
KM वॉटर प्रुफिंग 44 वर्षांपासून कामाचा अनुभव टेरेस, बाथरुम, संडास, बेसमेंट, पाण्याच्या टाकीची लिकेज 5 ते 10 वर्षांच्या 100% गॅरंटीने विनातोडफोड करुन मिळेल. संजय कुमावत-9822275444, संतोष कुमावत-7038818444 (18/7/25)

**१००% व्यसनमुक्ती**
✻गॅरंटीने सोडवा.दारु + गुटखा + सिगरेट + बीडी + मावा+ तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा+ ताडी + स्नेकबाईट + व्हाईटनर व्हाइटपावडर + हिरॉईन + चरस + कोकेन+MD + L.S.D Dot पेपर +झोपेची गोळी + इंजेक्शन, संपर्क :9552619752.,www.drpalvenashamuktikendra.in डॉक्टरपालवे,नशामुक्ती केंद्र,वरणगांव. (VM.10/01/26.CRINIV-2425JL/CRG00504)

**उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी**
जुनाट सर्दी,जुनाट गुडघेदुखी,चालता, बसता,उठता न येणे.जुनाट संधीवात/ चिकून गुनिया,जुनाट ॲलर्जी,जुनाट अर्धशिशी,जुनाट मुळव्याध,एचआयव्ही ,भुक लागत नाही?वजन कमी ? थकवा जाणवतो?LOW CD4 COUNT? उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी,भेटा-अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे,वरणगांव संपर्क:9552619752(VM.10/01/26. CRINIV-2425JL/CRG00505)

**ऐकण्याची समस्या ?**
अदृष्य डिजीटल कर्णयंत्र,वापरा सर्व कंपनीचे डिजीटल रिचार्जेबल कर्ण यंत्रावरती भरपुर सुट तसेच अडखत बोलणे,बोबडे बोलणे याच्यावर **स्पिच थेरपी**,तर आजच कानाची तपासणी करा संपर्क श्री साईकृपा स्पिच ॲण्ड हिअरिंग केअर,पांडुरंग टॉकीज मागे,दगडी पुला जवळ, भुसावळ,मो.9420899102, 9320899102.(VM 30/06/25)

**दारु बंदीचा गुरुमंत्र**
द ग्रेट साईंटिस्ट...(Best Doctor & GOLD MEDAL AWARDED) व्हॉटसअॅप डॉ.पालवे, ॲडमिट करा...।। नका करु...,पेशंटला सांगा....।। नका सांगु... पेशंटला आणा....।। नका आणु.... ✻ व्यसन पेंशंटचे... विश्वास तुमचा...उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती....सर्व सुविधांना परीपुर्ण :-✻व्यसनमुक्ती Special पॅक,मेडिसीन,इंजक्शन स्प्रे,ड्रॉप,ऑपरेशन,गोळी टाकणे, मंत्रोपच्चार...ॲडमिट सुविधा... ✻(विशेष)गरीबांसाठी फी मध्ये सवलत... तर आजच संपर्क: 9552619752.डॉक्टर पालवे, नशामुक्ती केंद्र,वरणगांव.(VM.10/01/26.CRINIV-2425JL/CRG00504)

**शिलाई मशीन रु.5550 पासून**
अरुण, उषा, रिमा, शिल्पा, विराट व इतर कंपनीचे शिलाई मशिन, सर्वप्रकारचे ओरिजनल स्पेअर्स व मशीन दुरुस्तीसाठी आर.के. शिलाई मशिन, दु.न.११, श्री गणपती, प्लाझा, स्टेट बँकशेजारी, चित्रा चौक, जळगाव, मोबाईल.9890874057, 9146074374 (VM30/06/25)